
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# क्रांतिकारी पुनर्रचना : लेखक यशवंत मनोहर




डॉ. संभाजी मलघे
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव, पुणे.

## प्रस्तावना :

क्रांतिकारी पुनर्रचना हा यशवंत मनोहरांचा लेख संग्रह, सकाळ दैनिकातील सप्तरंग पुरवणीत वेगवेगळ्या विषयांवर यशवंत मनोहरांनी केलेले मुक्त चिंतन. यशवंत मनोहर म्हणजे आधुनिक महाराष्ट्राच्या पुरोगामी जडणघडणीत आपल्या कविता निबंध समीक्षा भाषणे यांनी मोलाची भर घालून महत्वाची भूमिका बजाविणारे एक चिंतनशील कवी, समीक्षक, कादंबरीकर, निबंधकार, वक्ते आणि विचारवंत लेखक आहेत. म्हणूनच त्यांच्या क्रांतिकारी पुनर्रचना या पुस्तकाला एक वेगळे महत्व आहे. फुले शाहू आंबेडकर मार्क्स यांची क्रांतिकारी विचारधारा, त्यातील वैचारिक उर्जा महाराष्ट्रभर अविरत वाटत फिरत असलेला हा मनस्वी कवी. सम्यक विचार सम्यकदृष्टी घेऊन ते या पुस्तकातील प्रत्येक लेखात वावरताना दिसतात, आपल्या काव्यमय चिंतनाने भारावून टाकतात. पुस्तकातील लेखांकडे पाहण्याअगोदर ते स्वतः त्यांच्या लेखांकडे त्यांच्या लिहिण्यामागच्या प्रेरणेकडे कसे पाहतात हे महत्वाचे ठरते डॉ. यशवंत मनोहरांनी लक्षणीय वैचारिक लेखन केले आहे, डॉ. आंबेडकरांचा बुद्धधम्म, प्रबोधन विचार, डॉ. आंबेडकर एक शक्तीवेध, आंबेडकरांचे विद्रोही निबंध, मुल्यमंथन, असे विसेक ग्रंथ यशवंत मनोहर यांच्या नावावर आहेत. त्यांचा क्रांतीकारी पुनर्रचना हा ग्रंथ देखील या आधीच्या ग्रंथांचे वैचारिक वैभव वाढविणारा असाच आहे.

क्रांतिकारी पुनर्रचनेत प्रवेशण्याआधी अशी प्रस्तावनेची, मनोगताची सुरुवात आहे. त्यामध्ये यशवंत मनोहर लिहितात, ''सप्तरंगमध्ये लिहिताना मी जरा जास्तच गुंतत गेलो असंम्हणता येईल. चारपाच दिवस तरी लेख माझ्या मनाच्या गर्भाशयात सजीव आणि सावयव होत असे. लेखाची संपूर्ण संरचनाच अशी सगुण आणि साकार होत असे. लेखाचं नामकरण, लेखाची चाल,त्याची वाक् वळणे, चढण आणि उतरण असे सर्व बांधकाम मनात उगवत असे. एखाद्या वर्तमानपत्रासाठी आपण लिहित आहोत हे भानच मला राहत नसे. माझ्या मनाचं रुपांतर माझ्या प्रतिभेत होत असे आणि विषयांच्या शक्यतांच्या तळापर्यंत पोचणारी जिज्ञासा मला अस्वस्थतेत बुडवत असे. मी स्वतःचाच म्हणजे जीवनानं घडवलेल्या माझ्या भावविश्वाचा आणि विचारविश्वाचा शोध घेत होतो. स्वतःचीच कसून तपासणी करीत होतो. स्वतःचीच सतत विरचना आणि पुनर्रचना करीत होतो. प्रत्येक लेखाच्या वेळी मी स्वतःलाच नव्या परीक्षेला बसवत होतो. मीच एखाद्या झाडासारखा फुलत होतो आणि त्यापुढल्या फुलण्याला वाटा मोकळ्या करून देण्यासाठी स्वतःला पुन्हा पुन्हा खुडत होतो. लिहिण्याआधी तो तो विषय मला उकळत्या क्षणांशी बांधत असे इथे संरचना सावयव होत असे. लिहिताना खूप नवेनवे भोवरे आणि नवेनवे धुमारे मनात उधानु लागायचे. या उकळत्या अवस्थेत माझं मन आणि विषय या दोनच गोष्टी असायच्या या दोन्हींच्या आत मात्र जीवनातील संबंधांची गुंतागुंत असायची. या तिन्ही गोष्टी मला एका तंद्रीच्या शिखरावर घेऊन जात असत.'' यशवंत मनोहरांचे मनस्वीपणे झपाटून लिहिणे, चिंतनाच्या खोल मुळाशी जाणे, हे त्यांचा प्रत्येक लेख वाचताना जाणवत राहते. वर्चस्वाच्या वसाहतीविरुद्ध युद्ध, या लेखात सर्व सत्ताधीश शोषक केंद्र आणि परिघावरचे शोषक यांच्या परस्पर संबंधावर अत्यंत मूलगामी स्वरूपाचे चिंतन करत मनोहर शोषित वंचित बाधित कष्टकऱ्यांची बाजू घेत मानवमुक्तीचे, मानव कल्याणाचे वैश्विक पातळीवर बुद्ध आणि त्याची करुणा याचे ममत्व महत्व सांगणारा आपला विचार मांडतात. बाह्य सत्ताकेंद्रे आणि त्यांच्या शोषणाच्या तऱ्हा यावर भाष्य करत असतानाच आपल्या मनात वसत असलेल्या दुष्प्रवृत्ती त्यांच्या वसाहतीविरुद्ध देखील युद्ध पुकारण्याचे आवाहन ते करतात त्यांच्या चिंतनातून डोकावणारा मानवमुक्तीचा आशावाद खूप सुंदर चित्र घेऊन डोळ्यासमोर उभा राहतो. ''आपल्याला

आपल्या सोबतच नव्याने युद्ध सुरु करायला हवं. आपल्या मनातल्या वर्चस्वाच्या वसाहतींविरुद्ध आपणापैकी प्रत्येकालाच संग्राम व्हावं लागेल. असं झालं तरच आपल्याला समाजवादी चांदणसंस्कारांनी फुलता येईल. समाजवादी भावनांचा निसर्ग आपल्याला होता येईल. समाजवादी विचारांचा उजेड आपल्या बोलण्यातून आणि चालण्यातून पिसरू शकेल. या शांतीसाठी गरज आहे ती आपणच आपल्याविरुद्ध करावयाच्या युद्धाची, महायुद्धाची!'' एका मनस्वी कवीचे हे चिंतन वैयक्तिक सार्वत्रिक वैश्विक पातळीवर शांतीला साद देत सर्व मानवाला आवाहन करत असल्याचे दिसून येते. क्रांतीची मशाल हातात घेऊन अंधाराशी दोन हात करत मूर्तीभंजन करणाऱ्या प्रज्ञावंत कवीचे हे आव्हान आजच्या काळाला अत्यंत अनुरूप अशी ठोस भूमिका घेणारे आहे, हे निर्विवादपणे मान्य करायला हवे. उत्तराधुनिकतावाद नावाची प्रतिक्रांती, माणूस शिकविणारे ग्रंथ, संक्रमणकाळ आणि कवी, भाषेचा तुरुंग आणि तुरुंग तोडणारी भाषा, लेखकाचा जन्म, विश्वसमाजवादाचं व्याकरण, वेदनेची बीजाक्षरे, अज्ञानरचना विरुद्ध ज्ञानरचना हे क्रांतिकारी पुनर्रचना संग्रहातील काही निवडक लेख. यांची शीर्षके जरी पहिली तरी लेखकाच्या चिंतन विषयाचा आवाका लक्षात येतो. जागतिकीकरण आणि त्यानुरूप वर्तमानातले बदलते संदर्भ टिपणारे कविमन कवी व संक्रमणकाळ या लेखातून आपल्याला भेटते. भांडवलसहीच्या अघोरी बाजारीकरणाने निर्माण झालेल्या हृद्यशून्य बाजारपेठा व मानवी मूल्यांना पदच्युत करणारी उपभोगवादी ग्राहक संस्कृती यावर यशवंत मनोहर मार्मिक भाष्य करतात. यशवंत मनोहर त्यांच्या लेखामधून राजकीय सामाजिक शैक्षणिक धार्मिक हे विषय अत्यंत काव्यात्मक पातळीवर आपल्या समोर सादर करतात त व्हा त्या लेखांची वैचारिक ताकद शब्दफुलोऱ्या मध्ये न दबता वाचकाला दृष्टीगोचर होते ते त्यांच्या सुंदर सालंकृत शब्द शैलीचे आगळेवेगळे वैशिट्य आपल्या लक्षात येते.

भारतीय इहवाद विरुद्ध हिंदू देशीवाद या लेखामध्ये यशवंत मनोहर देशीवादाचा आढावा घेताना भारतीय संस्कृतीमधील सरंजामी जात मानसिकता आणि लाभार्थी दृष्टीकोनातून टिकवून ठेवलेल्या इथल्या अजस्त्र अशा सनातनी गढ्यांना जमीनदोस्त करण्याचे आव्हान देत असल्याचे लक्षात येते. देशीवाद खरे म्हणजे सामाजिक आर्थिक धार्मिक शैक्षणिक वा वाङ्मयीन मूलतत्त्ववाद असतो. आपल्या चौकटीबाहेरचं देशिवादाला काही मान्य नसतं. थांबलेपणा बदलणं देशीवाद नाकारतो, आपल्यापेक्षा कोणी वरचढ ठरेल किंवा आपण नष्ट होऊन जाऊ ही भीती या प्रवाहपतित विचारधारा जोपासणाऱ्या लेखक कवी विचारवंतांच्या लिहिण्यातून डोकावत असते हे वास्तव मांडतात.

क्रांती हा या पुस्तकातील अत्यंत महत्वाचा लेख या लेखामध्ये यशवंत मनोहर, एकूणच सर्व जात वर्ग युक्त समाज समोर ठेऊन त्याच्या हिताचे मंगल होण्याचे चिंतन करतात त्यासाठीची उपाययोजना सांगताना ते काही प्रश्न उपस्थित करून त्याची उत्तरे देत देत अत्यंत मूलगामी स्वरूपाचे प्रबोधन करतात. क्रांती म्हणजे काय? काँग्रेसचे सरकार जाऊन भाजपचे सरकार येणं किंवा भाजपचे सरकार जाऊन काँग्रेसचं सरकार येणं ही नाही. कशासाठी, कोणत्या मूल्यांसाठी परिवर्तन आहे समाजातील सर्व घटकांना कवेत घेणारे न्याय्य स्वरुपाचे ते असणार आहे का? याच्या सुस्पष्ट रेखा आंदोलन कर्त्यांच्या मनात असायला हव्यात. भारतातील जाती प्रथेची निर्मिती, तिचं संरक्षण आणि तिचा पुरस्कार या सर्वच गोष्टी मानवी प्रतिष्ठेच्या चिंध्या करणाऱ्या आहेत या गोष्टीवर बोट ठेवत इथल्या समाजव्यवस्थेचं चित्रण करताना ते कमालीचं वास्तव मांडतात. एका बाजूला हजारो कोटीची मालमत्ता असणारे लोक तर काहींना दोन वेळच्या जेवणाची भ्रांत, डोक्यावर छप्पर नाही, बौद्धिक उन्नतीला शिक्षण नाही, अब्रू झाकायला वस्त्र नाही. एका बाजूने सुविधेचे डोंगर तर दुसऱ्या बाजूने मूलभूत मानवी गरजा पूर्ण होण्याची वानवा. भीषण दुष्काळी परिस्थिती, अगतिक करणारी महागाई आणि सोबत माणसांना मतीमंद करणाऱ्या भयानक अंधश्रद्धा.

मानवी सन्मानाची न्याय्य मुल्ये स्वातंत्र्य समता बंधुता यांची पराकोटीची कोसळण होत असलेल्या या काळात क्रांती व क्रांतीची पुनर्रचना मांडणारे यशवंत मनोहरांचे चिंतन केवळ आजच्या काळातीलच न्हवे तर सर्व काळातील सुजाण वाचकांना कृतीप्रवण करणारे आहे.

सत्तास्वामींच्या हितसंबंधाच्या परिघाबाहेर भाषा जात नाही आणि त्यातून चलाखीने भाषिक बळावर वंचितांची संमती घेऊन फसवणूक तंत्र अवलंबिले जाते तेंव्हा भाषेचा तुरुंग फोडणारी भाषा वंचीतांनी आत्मसात करायला हवी असे मनोहरांना वाटते. क्रांतीची पुनर्रचना म्हणजे काय? हे यशवंत मनोहर अत्यंत सयंतपणे आपल्या लेखातून मांडत जातात. जिंदगी मौत ना बन जाये या लेखामधून सर्व मानवी अस्तित्वाला भयाने व्यापून

टाकणाऱ्या मृत्यूविषयीचे चिंतन यशवंत मनोहर करतात. मृत्यू हे मानवी जीवनातील हिंसेचं आदिविद्यापीठ आहे. अशी रचना करून ते मृत्यूकडे पाहण्याचा एक नवा क्रांतिकारी दृष्टीकोन ते वाचकाला प्रदान करतात.

स्वतंत्र्य समता बंधुता या चिरंतन वैश्विक मुल्यांना धुळीत मिळविणारा काळाचा एक तुकडा प्रत्येक दीर्घ कालखंडात काही काळ उजागर होऊन लोकांमध्ये भय निर्माण करीत असतो तेंव्हा महत्वाची असते ती लेखक कवी विचारवंत यांची या मानवमुक्तीचे तिच्या अभिव्यक्तीचे सुंदर गान गाणारी, प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध शड्डू ठोकून उभे राहणारी अविरत लढणारी लेखक कवी पत्रकार कलावंत यांची ठोस भूमिका. फ्यासीझम म्हणजे वंशश्रेष्ठत्वाच्या स्थापनेची अघोरी तृष्णा या लेखात यशवंत मनोहरांनी जगातल्या हुकुमशाही राजवटींचा परामर्श घेत आजच्या भारतीय नेतृत्वाची परखड चिकित्सा केली आहे. व्यक्तीस्वातंत्र्याच्या संकोच होण्याच्या या अघोरी काळात एक चिंतनशील लेखक कवी निडरपणे, आपल्या शब्दशस्त्राने आपले दायित्व बांधिलकी सिद्ध करत असल्याचे पावलोपावली जाणवते.

या पुस्तकातील सर्वच लेख अत्यंत महत्वाचे असून समकाळावर दीर्घकाळ ठसा उमटविणारे, तसेच सुजाण चिंतनशील वाचकाला विचारप्रवण कृतीसन्मुख करणारे आहेत हे नक्की.